# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन करणार २० हजार ९०० वृक्षांची लागवड

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या पावसाळ्यात मुंबई मेट्रो-३ आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान संयुक्त विद्यमाने २०,९०० वृक्षांची लागवड मुंबई मेट्रो-३ आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांच्यामधील करारानुसार करण्यात येणार आहे. शुक्रवारी मालाड मातंगड या ठिकाणी या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला.

वृक्ष प्रधिकरणाच्या मान्यतेनुसार मुंबई मेट्रो-३ यांच्यामार्फत १० हजार ४५० वृक्षांची लागवड करण्यात येणार असून उर्वरित वृक्षांची लागवड ही मुंबई मेट्रो-३ च्या सामाजिक जाणिवेतून सीएसआर उपक्रमाअंतर्गत करण्यात येणार आहे. नॅशनल पार्कने निर्धारित केलेल्या १९ हेक्टर जनिनीचा वापर मुंबई मेट्रो- ३ यासाठी करणार आहे. या अभियानाचा प्रारंभ खासदार पूनम महाजन यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी मुंबई मेट्रो-३ च्या व्यवस्थापकीय संचालक आश्विनी भिडे म्हणाल्या की, मी नॅशनल पार्कचे मुख्य वनसंरक्षक अनवर अहमद यांचे आभार मानते. त्यांनी केवळ जमीन उपलब्ध केली नाही, तर ते स्वतः सहभागी झाले. लागवड यशस्वी होईल करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाईल.